Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University
Chhatrapati Sambhajinagar-431004
Maharashtra (India)
NAAC Re-accredited 'A' Grade

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ
छत्रपती संभाजीनगर-४३१००४. महाराष्ट्र (भारत)
नॅक समितीतर्फे 'अ' दर्जा प्राप्त

Telephone
Office PBX : (0240) 2403399/400
C.O.E. : (0240) 2403200
Fax : (0240) 2403199/188
Website : www.bamu.ac.in
http://bamua.digitaluniversity.ac
E-Mail : coe@bamu.ac.in

Office : Director, Board of Examinations & Evaluation

कार्यालय : संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

संदर्भ : परीक्षा/समन्वय/२०२४/353 दिनांक : २५.०९.२०२४

**प्रति,**

**प्राचार्य/संचालक,**
**सर्व संबंधित महाविद्यालये/परिसंस्था,**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,**
**छत्रपती संभाजीनगर.**

विषय : ऑक्टोबर/नोव्हेंबर, २०२४ मध्ये होणाऱ्या पदवी प्रथम ते सहावे सत्राच्या परीक्षा महाविद्यालय स्तरावर घेऊन निकाल घोषित करणेबाबत.

संदर्भ : परीक्षा/समन्वय/२०२४/३२७, दि. १०.०९.२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली कार्यपध्दती.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयी व संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, मा. परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या दि. १८.०९.२०२४ रोजी बैठकीतील प्रस्तावावर सोबत जोडलेल्या यादीत नमूद केलेल्या पदवी प्रथम ते सहावे सत्र अभ्यासक्रमांच्या ऑक्टोबर/नोव्हेंबर, २०२४ मध्ये होणाऱ्या परीक्षा महाविद्यालय स्तरावर आयोजित करुन निकाल घोषित (Home Center & Home Assessment) करण्यात याव्यात व सदर प्रक्रिया ही प्रस्तुत विद्यापीठाने पदवी प्रथम वर्ष प्रथम सत्र अव्यावसायिक अभ्यासक्रमांकरिता प्रसिध्द केलेल्या कार्यपध्दतीनुसार करण्यात यावी असा ठराव पारित करण्यात आलेला आहे.

त्यानुसार खालील तक्त्यात नमूद केलेल्या पदवी प्रथम ते सहाव सत्र अभ्यासक्रमांची ऑक्टोबर/नोव्हेंबर, २०२४ मध्ये घेण्यात येणारी परीक्षा महाविद्यालय/परिसंस्था स्तरावर घेऊन निकाल घोषित (Home Center & Home Assessment) करण्याच्या अनुषंगाने प्रक्रिया पूर्ण करावी.

| Sr. No. | Name of Course | Name of Pattern |
|---|---|---|
| 1. | B.A. I to VI Semester | P-2013 |
| 2. | B.Sc. I to VI Semester | P-2013 |
| 3. | B.Sc. (Computer Science) I to VI Semester | P-2014 |
| 4. | B.Sc. (Information Technology) I to VI Semester | P-2014 |
| 5. | B.Sc. (Biotechnology) I to VI Semester | P-2014 |
| 6. | B.Sc. (Home Science) I to VI Semester | P-2014 |
| 7. | B.Sc. (Networking & Multi.) I to VI Semester | P-2014 |

करिता, माहिती व योग्यत्या कार्यवाहीस्तव.

**सोबत : संदर्भिय पत्र.**

संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University
Chhatrapati Sambhajinagar-431004
Maharashtra (India)
NAAC Re-accredited 'A' Grade

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ
छत्रपती संभाजीनगर-४३१००४. महाराष्ट्र (भारत)
नॅक समितीतर्फे 'अ' दर्जा प्राप्त

Telephone
Office PBX : (0240) 2403399/400
C.O.E. : (0240) 2403200
Fax : (0240) 2403199/188
Website : www.bamu.ac.in
http://bamua.digitaluniversity.ac
E-Mail : coe@bamu.ac.in

Office : Director, Board of Examinations & Evaluation

कार्यालय : संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ


संदर्भ : परीक्षा/समन्वय/२०२४/३२७ दिनांक : १०.०९.२०२४

**प्रति,**

**प्राचार्य/संचालक,**
**सर्व संबंधित महाविद्यालये/परिसंस्था,**
**(पदवी अव्यावसायिक अभ्यासक्रम फक्त),**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,**
**छत्रपती संभाजीनगर.**

विषय : शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून यापत्रासोबत जोडलेल्या कार्यपध्दतीनुसार पदवी प्रथम वर्ष प्रथम सत्र अव्यावसायिक अभ्यासक्रमांच्या परीक्षा महाविद्यालय स्तरावर घेऊन निकाल घोषित करणेबाबत.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने मा. कुलगुरु महोदयांनी दिलेल्या आदेशान्वये आपणांस कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासुन पदवी प्रथम वर्ष प्रथम सत्र अव्यावसायिक अभ्यासक्रमांची परीक्षा महाविद्यालय स्तरावर घेऊन निकाल घोषित करण्याच्या (Home Center & Home Assessment) अनुषगाने विद्यापीठाच्या विविध समक्ष प्राधिकरणांनी मान्यता दिलेली आहे आणि विहित कार्यपध्दती निश्चित केलेली आहे.

सबब, पदवी प्रथम वर्ष प्रथम सत्र अव्यावसायिक अभ्यासक्रमांची परीक्षा महाविद्यालय स्तरावर घेऊन निकाल घोषित करण्याच्या अनुषंगाने सोबत जोडलेल्या कार्यपध्दतीनुसार सर्व संबधितांनी परीक्षा आयोजनाची प्रक्रिया पूर्ण करावी.

करिता, माहिती व योग्यत्या कार्यवाहीस्तव.

**सोबत : वरीलप्रमाणे**

Bharti

**संचालक**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

## शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून पदवी प्रथम वर्ष (प्रथम सत्र - I Sem.) अव्यावसायिक अभ्यासक्रमांच्या परीक्षा महाविद्यालय स्तरावर घेऊन निकाल घोषित करण्यासाठीची कार्यपध्दती

| | | |
|---|---|---|
| **१)** | **पदवी प्रथम वर्ष (प्रथम सत्र - I Sem.) परीक्षा महाविद्यालय स्तरावर आयोजित करावयाच्या अभ्यासक्रमांच्या परीक्षांची यादी खालीलप्रमाणे आहे :-** | |
| | १. | बी.ए. (सर्व अभ्यासक्रम) प्रथम वर्ष (प्रथम सत्र - I Sem.) |
| | २. | बी.कॉम. (सर्व अभ्यासक्रम) प्रथम वर्ष (प्रथम सत्र - I Sem.) |
| | ३. | बी.एस्सी. (सर्व अभ्यासक्रम) प्रथम वर्ष (प्रथम सत्र - I Sem.) |
| **२)** | **महाविद्यालय स्तरावर करावयाची कार्यवाही :-** | |
| | **अ)** | **परीक्षा आयोजन पध्दती** |
| | १. | शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून पदवी प्रथम वर्ष (प्रथम सत्र - I Sem.) अभ्यासक्रमांच्या परीक्षा महाविद्यालय/परिसंस्था स्तरावर घेण्यात येतील. परीक्षा आयोजन व इतर अनुषंगीक बाबींबाबत कार्यवाही करण्यासाठी सबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य/परिसंस्थेचे संचालक तथा परीक्षा केंद्र प्रमुख हे प्रमुख असतील. |
| | २. | परीक्षेसाठी वापरण्यात येणारे सर्व दस्तऐवज तीन वर्षापर्यंत जतन करुन ठेवणे आवश्यक आहे (उदा. उपस्थिती अहवाल, उत्तरपत्रिकांचा हिशोब, विद्यापीठास सादर केलेला पत्रव्यवहार, इत्यादी). वेळोवेळी विद्यापीठामार्फत होणाऱ्या एकूण परीक्षा पध्दतीच्या गुणवत्ता पडताळणीसाठी दस्तऐवज उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी महाविद्यालयाचे प्राचार्य/परिसंस्थेचे संचालक तथा परीक्षा केंद्र प्रमुख यांच्यावर राहील. |
| | ३. | परीक्षा केंद्र प्रमुख यांनी परीक्षा सुरु होण्यापूर्वी व परीक्षा सुरु असतांना कोणत्याही प्रकारचे प्रिंट/इलेक्ट्रॉनिक माध्यमातून गोपनिय दस्तऐवज परीक्षा केंद्राबाहेर जाणार नाही; याची दक्षता घ्यावयाची आहे. असे आढळून आल्यास संबंधितांवर महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ अन्वये कार्यवाही करण्यात येईल. |
| | ४. | प्रथम वर्ष (प्रथम सत्र - I Sem.) अंतीम लेखी परीक्षा, अंतर्गत मूल्यांकनाच्या परीक्षा, प्रात्यक्षिक परीक्षा, यांचे ऑनलाईन पध्दतीने गुण नोंदणीकरिता विद्यापीठाने ठरवून दिलेल्या विहित मुदतीतच करणे अनिवार्य असेल. |
| | ५. | प्रथम वर्ष (प्रथम सत्र - I Sem.) अभ्यासक्रमांच्या परीक्षांसाठी परीक्षा केंद्र प्रमुखांनी विद्यापीठाने विहित करुन दिल्यानुसार सत्र निहाय ऑनलाईन पध्दतीने विद्यार्थ्यांची उपस्थिती व अनुपस्थित (Present & Absent) अहवाल नोंदविणे बंधनकारक असेल. जे परीक्षा केंद्र ऑनलाईन पध्दतीने नोंद करणार नाही अशा परीक्षा केंद्रांचे सदर सत्राच्या परीक्षेचे देयक परिपुर्तीसाठी लेखा विभागास वर्ग केले जाणार नाहीत. |
| | ६. | परीक्षे दरम्यान परीक्षा केंद्र प्रमुख/भरारी पथक/परीक्षा सहकेंद्र प्रमुख यांनी गैरप्रकरणी नोंदविलेल्या उत्तरपत्रिका अहवाल त्याच दिवशी ऑनलाईन पध्दतीने समाविष्ठ करण्यात यावा व सदर उत्तरपत्रिका सदर सत्राच्या परीक्षा संपल्यानंतर पुढील ०२ दिवसात संबधित कक्ष, परीक्षा व मूल्यमापन विभाग, विद्यापीठ परिसर यांच्याकडे जमा करण्यात यावे. जे परीक्षा केंद्र ही पध्दती अवलंबणार नाही त्यांच्यावर महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ अन्वये कार्यवाही करण्यात येईल. |
| | ७. | राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० नुसार विद्यापीठाने प्रसिध्द केलेल्या शैक्षणिक वेळापत्रकान्वये अंतर्गत परीक्षा घेऊन पाच दिवसांच्या आत मध्ये अंतर्गत गुणांची नोंदणी ऑनलाईन पध्दतीने करुन घेणे अनिवार्य असेल. (सोबत परिपत्रक जोडण्यात आलेली आहे.) |
| | ८. | संबधीत परीक्षार्थीची ७५ टक्के उपस्थितीची पडताळणी करण्याची जबाबदारी संबधित महाविद्यालयाचे प्राचार्य/परिसंस्थेचे संचालक यांची असेल. |

| | | |
|---|---|---|
| | ब) | **उत्तरपत्रिका मूल्यांकन पध्दती** |
| | १. | उत्तरपत्रिका मूल्यांकन करुन घेण्याची कार्यवाही करण्यासाठी सबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य/परिसंस्थेचे संचालक तथा परीक्षा केंद्र प्रमुख हे प्रमुख असतील. |
| | २. | परीक्षेदरम्यान झालेल्या गैरप्रकारासबंधिची प्रकरणे सदर सत्राची परीक्षा संपल्यांनतर सबंधित कक्ष प्रमुख, परीक्षा व मूल्यमापन विभाग, विद्यापीठ परिसर यांच्याकडे परीक्षा संपल्याच्या दिनांकापासून पुढील पाच (०५) दिवसांच्या आत उत्तरपत्रिका व इतर साहित्य सादर करणे अनिवार्य असेल. |
| | ३. | संबधित विषयाची परीक्षा झाल्यांनतर पुढील पाच (०५) दिवसांच्या आत उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन करुन गुणयाद्यांची ऑनलाईन पध्दतीने नोंदणी करुन संबधित विषयाचे अध्यापक व प्राचार्य यांनी मूळ गुणयाद्या, ऑनलाईन नोंदणी करुन संगणकीय प्रणालीव्दारे जनरेट झालेल्या गुणयाद्यांच्या प्रत्येक पानावर स्वाक्षरी करणे अनिवार्य असेल. |
| | ४. | उत्तरपत्रिका मूल्यांकन हे संबधित विषयाच्या विद्यापीठ मान्यता प्राप्त अध्यापकांकडून करुन घेणे अनिवार्य असेल. उत्तरपत्रिका मूल्यांकनासाठी देय असलेले मानधन प्रचलित नियमाप्रमाणे लागू राहिल. |
| | ५. | प्रथम वर्ष (प्रथम सत्र - I Sem) अभ्यासक्रमांच्या सदर सत्राच्या परीक्षा संपल्यानंतर उत्तरपत्रिका मुल्यांकन, गुणयाद्या ऑनलाईन सादर करणे, परीक्षार्थींच्या आलेल्या तक्रारींचे निराकरण करणे, उत्तरपत्रिका, गुणयाद्या विद्यापीठाने निश्चित केलेल्या संकलन केंद्रावर जमा करणे व इतर बाबींबाबत सोबत जोडलेल्या कार्यपध्दतीनुसार कार्यवाही करावी.<br>**(टिप: याबाबतचे सविस्तर कार्यपध्दती सोबत जोडली आहे. प्रपत्र-अ)** |
| | ६. | उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन झाल्यानंतर संगणकीय प्रणालीव्दारे जनरेट केलेल्या गुणयाद्या व उत्तरपत्रिकांवरील गुणांची पडताळणी (Read By & Check By) करुन घेण्यात यावी व उत्तरपत्रिका व गुणयाद्या यांची पडताळणी करणाऱ्यांचे नाव, पदनाम संबधित गुणयाद्याच्या प्रत्येक पानावर नोंदवून स्वाक्षरी करणे बंधनकारक राहील. |
| | ७. | उत्तरपत्रिका मुल्यांकनांच्या अनुंषगाने महाविद्यालयाचे प्राचार्य/परिसंस्थेचे संचालक यांनी विद्यापीठाने विहित करुन दिल्यानुसार हमीपत्र सादर करणे आवश्यक असेल. **(प्रपत्र-ब सोबत जोडण्यात आलेले आहे.)** |
| | ८. | इतर प्रकारे कोणत्याही कारणाने निकाल राखीव असल्यास कक्ष प्रमुख, संबंधित कक्ष, परीक्षा व मूल्यमापन विभाग, विद्यापीठ परिसर यांच्याशी सदर सत्राचा निकाल घोषित झाल्यानंतर पुढील आठ (०८) दिवसांच्या आत संपर्क करुन विद्यार्थ्यांचे निकाल घोषित करुन घेण्याची जबाबदारी संबधित महाविद्यालय/परिसंस्थेच्या प्राचार्य/संचालक तथा परीक्षा केंद्र प्रमुख यांची राहील. |
| | ९. | ज्या महाविद्यालयाचे परीक्षा केंद्र विद्यापीठ प्राधिकरणाकडून रद्द करण्यात आलेले आहे अशा महाविद्यालयाचे परीक्षा केंद्र हे जवळच्या इतर महाविद्यालयात देण्यात येईल. रद्द करण्यात आलेल्या परीक्षा केंद्राच्या अध्यापकांनी परीक्षा केंद्र दिलेल्या ठिकाणी जाऊन आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करणे अनिवार्य असेल. |
| | १०. | परीक्षेशी संबधित विद्यार्थ्यांच्या सर्व प्रकारच्या तक्रारी महाविद्यालय/परिसंस्था स्तरावर परीक्षा तक्रार निवारण कक्ष स्थापन करुन तक्रारीचे निवारण करण्यात यावे. परीक्षा तक्रार समितीचे प्रमुख म्हणून प्राचार्य/संचालक/परीक्षा केंद्र प्रमुख हे प्रमुख असतील. |
| **३)** | **विद्यापीठाने करावयाची कार्यपध्दती :-** | |
| | १. | प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने करुन घेणे. |
| | २. | परीक्षा आवेदन पत्र व परीक्षा शुल्क हे संबधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश अर्जासोबतच भरुन घेणे आवश्यक आहे. |
| | ३. | परीक्षांच्या तारखा निश्चित करुन महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ नुसार विहित वेळेत वेळापत्रक प्रसिध्द करणे. |
| | ४. | सर्व संबधित अभ्यासक्रमांच्या प्रश्नपत्रिका परीक्षेच्यावेळी उपलब्ध करुन देणे. (प्रचलित पध्दतीप्रमाणे) व परीक्षा आयोजनासाठी उत्तरपत्रिका भांडार कक्ष, विद्यापीठ परिसर यांच्या मार्फत उपलब्ध करुन देणे. (भांडार कक्ष, परीक्षा व मूल्यमापन विभाग संपर्क क्र. ०२४०-२४०३१९६) |
| | ५. | वेळापत्रक, हॉल टिकीट इत्यादी बाबत संगणकीय प्रणालीव्दारे विहित कालमर्यादेतच उपलब्ध करुन देणे. |
| | ६. | परीक्षा आयोजनासाठी विद्यार्थ्यांची नावांची यादी (Name List) व गोषवारा (Summary) ऑनलाईन उपलब्ध करुन देणे. |

| | | |
|---|---|---|
| | ७. | प्रात्यक्षिक/लेखी परीक्षेचे गुण भरण्यासाठी डेटा लिंक (Data Link) उपलब्ध करुन देणे. |
| | ८. | महाविद्यालय/परिसंस्थेने उत्तरपत्रिका मूल्यांकन करुन ऑनलाईन गुणयाद्या सादर केल्यानंतर महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ नुसार विहित निकाल घोषित करणे. |
| | ९. | परीक्षा निकाल घोषित झाल्यानंतर पुढील २० दिवसांच्या आत गुणपत्रक (Mark Memo) उपलब्ध करुन देण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल. तसेच एच.टी.एम.एल. चे गुणपत्रक ऑनलाईन पध्दतीने उपलब्ध करुन देणे. |
| | १०. | विद्यापीठाने निश्चित केलेल्या संकलन केंद्राच्या प्रमुखांनी त्यांच्या संकलन केंद्रास निर्गमित केलेल्या परीक्षा केंद्रांनी जमा केलेल्या सर्व संबधित अभ्यासक्रमांच्या मूल्यांकन झालेल्या उत्तरपत्रिका, गुणयाद्या व ऑनलाईन नोंदणी केलेल्या गुणयाद्या संबधित कक्ष प्रमुख, परीक्षा व मूल्यमापन विभाग, प्रस्तुत विद्यापीठ येथे परीक्षा संपल्यानंतर पुढील दहा (१०) दिवसांच्या आत जमा करुन पोहच द्यावी. |
| | ११. | कक्ष अधिकारी/कक्ष प्रमुख यांनी संकलन केंद्रांनी जमा केलेल्या गुणयाद्या व इतर दस्तऐवज योग्य आहेत किंवा नाही याबाबतची पडताळणी करुन घ्यावी त्यानंतरच पोहच द्यावी. |
| | १२. | **परीक्षा व मूल्यांकन गुणवत्ता पडताळणी समिती :-**<br>१. अध्यक्ष ______________________<br>२. सदस्य-१ ______________________<br>३. सदस्य-२ ______________________<br>४. सदस्य सचिव ______________________<br>समितीचे कर्तव्य व जबादारी :-<br>१. सबंधित महाविद्यालयांने सादर केलेल्या उत्तरपत्रिका, गुणयाद्या व संगणकीय प्रणालीव्दारे जनरेट झालेल्या गुणयाद्यांची एकमेकांशी पडताळणी करणे.<br>२. संकलन केंद्रास ज्या महाविद्यालय/परिसंस्था यांनी विहित मदतीत दस्तऐवज सादर केलेले नाहीत अशा महाविद्यालय/परिसंस्थांची माहितीबाबतचा अहवाल दोन दिवसात coe @bamu.ac या विद्यापीठाच्या ई-मेल आयडीवर करण्यात यावा. |
| | १३. | सर्व संबधित कक्ष, परीक्षा व मूल्यमापन विभाग यांचे संपर्क क्रमांक उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने परिपत्रक निर्गमित करण्यात येईल. जेणे करुन महाविद्यालयांना येणाऱ्या अडचणीचे निरसन करणे सोयीईचे होईल. |

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Chhatrapati Sambhajinagar

प्रपत्र-अ

## प्रथम वर्ष (प्रथम सत्र) अंतर्गत गुणनोंदणी, उत्तरपत्रिका मूल्यांकन व निकालाकरिता अवलंबावयाची कार्यपद्धती:

| अ. क्र | विहित मुदत | : | पासून पर्यंत (दिनांक) | दिवस |
|---|---|---|---|---|
| * | अंतर्गत गुणदान ऑनलाईन गुणनोंदणी (Online Data Entry Continuous Internal Assessment) | : | As per the scheme of Examination under National Education Policy-2020 Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Chhatrapati Sambhajinagar, Circular No. ACAD-SU/UG/NEP-2020/ Scheme of Exam.77/2024/26092-105, dated 26-04-2024. | 10 |
| * | विद्यापीठ अंतीम लेखी परीक्षा सुरुवात आणि शेवटचा पेपर (Final Examination Schedule) | : | | 08 |
| * | विद्यापीठ अंतीम लेखी परीक्षेचे उत्तरपत्रिका तपासणी शेवटच्या पेपरनंतर (Theory paper Assessment after the Last Theory Paper of NEP 2020 Ist Semester) | : | | 07 |
| * | सूचना फलकावर निकाल लावणे (Properly display the marks on the Notice Board) | : | | 03 |
| * | निकालावर परीक्षार्थी कडून तक्रारी स्विकारणे आणि परीक्षार्थीच्या तक्रारीचे निराकरण (Include a statement outlining the process to apply for Grievance) | : | | 06 |
| * | निकाला वरील तक्रारींच्या निराकरणानंतर ऑनलाईन गुण नोंदणी करणे (Final Examinations Assessment Online Data Entry) | : | | 07 |
| * | लेखी परीक्षेच्या ऑनलाईन गुण नोंदणी केलेल्या याद्या प्रिंट काढून विद्यापीठ परीक्षा विभागाच्या संबंधीत कक्षाकडे सादर करणे (Submission of Final Online Data Entry Printout with Authorized Signature) | : | | 07 |
| * | विद्यापीठाने अंतीम निकालाची तयारी करणेसाठी (Preparation of Final Result by the Board of Examinations & Evaluation) | : | As per The Maharashtra Public University Act, 2016 | 07 |
| * | अंतीम निकाल जाहीर करणे (Declaration of Final Result by the Board of Examinations & Evaluation) | : | As per The Maharashtra Public University Act, 2016 | |

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University ★ Chhatrapati Sambhajinagar

प्रपत्र-ब

महाविद्यालय/परिसंस्थेचे लेटर हेड

# हमीपत्र

**प्रति,**
**संचालक**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,**
**छत्रपती संभाजीनगर**

**विषय : पदवी प्रथम वर्ष (प्रथम सत्र - I Sem.) अव्यावसायिक अभ्यासक्रमांच्या ऑक्टोबर/नोव्हेबर-२०२४ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षा उत्तरपत्रिका मुल्यांकन अहवालाबाबत.**

संदर्भ :

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास विनंती येते की, ऑक्टोबर/नोव्हेंबर, २०२४ च्या बी.ए., बी.कॉम. व बी.एस्सी. प्रथम वर्ष (प्रथम सत्र व व्दितीय सत्र - I & II Sem.) आमच्या महाविद्यालय स्तरावर घेण्यात असलेल्या असून विद्यापीठाने ठरवून दिलेल्या कार्यपध्दतीप्रमाणे संबधित अभ्यासक्रमांच्या उत्तरपत्रिकांचे खालील अध्यापकांकडून मूल्यांकन करुन घेण्यात आलेले आहे :

| अ. क्र. | अध्यापकाचे नाव | अभ्यासक्रम व सत्र | विषय | भ्रमणध्वनी क्र. | मुल्यांकन केलेल्या एकुण उत्तरपत्रिकांची संख्या | स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | A.B.C | B.A. I Sem | Marathi-I | 0000000000 | 124 | |
| २. | | | | | | |
| ३. | | | | | | |
| ४. | | | | | | |
| ५. | | | | | | |
| ६. | | | | | | |
| ७. | | | | | | |
| ८. | | | | | | |

करिता, उपरोक्त नमूद केलेली माहिती सत्य असुन प्रमाणित करुन देण्यात येत आहे. याची सर्वस्वी जबाबदारी खाली स्वाक्षरी करण्याऱ्यांची असेल.

अहवालाचा स्विकार व्हावा ही अपेक्षा !

प्राचार्य/संचालक
नाव
भ्रमणध्वनी क्र.
शिक्का

महाविद्यालय/परिसंस्थेचा शिक्का